# "विद्यापीठ आणि महाविद्यालयीन प्रशासनातील रिक्त पदांच्या अनुशेषाचा गुणवत्तेवर होणारा परिणाम : एक प्रशासकीय अभ्यास”

**(विशेष संदर्भ - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड)**

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**मानव्य विज्ञान विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयातील**
**पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला संशोधन विषयाचा आराखडा**


**संशोधक**

**शिवाजी धोंडीबा चांदणे**

लोकप्रशासन संशोधन केंद्र

देगलूर महाविद्यालय, देगलूर

**संशोधन मार्गदर्शक**

**प्रा. डॉ. बालाजी आर. कत्तुरवार**

लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्रप्रमुख,

देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड

**1.1 प्रस्तावना :**

मानवी जीवनासाठी अन्न, वस्त्र व निवारा या मुलभूत गरज इतकेच शिक्षण ही देखील एक प्रमुख व मुलभूत गरज बनली आहे. मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्व आहे. कोणतेही राष्ट्र असो त्या राष्ट्राचा भविष्यकाळ हा तेथील शिक्षण व आरोग्य व्यवस्थेवरच मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो. दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातूनच व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होत असतो. भारतातील शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास केल्यास अंगणवाडी, बालवाडी, एल.के.जी., यु.के.जी., प्राथमिक शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण, पदवी व पदव्युत्तर शिक्षण तसेच व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा सर्वांगीण विकास होत असतो. त्यामुळे भारतीय राज्यघटनेमध्ये शिक्षणासाठी विशेष तरतूद केली आहे. भारतातील 14 वर्षाखालील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतदू भारतीय राज्यघटनेत करण्यात आली आहे.

कोणतेही राष्ट्र असो त्या राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. त्यासाठी उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना दर्जेदार उच्च व तंत्रशिक्षाची देण्याची जबाबदारी विद्यापीठ व महाविद्यालयाची असते. केंद्र व महाराष्ट्र शासनाद्वारे वर्तमान शिक्षण प्रणालीमध्ये कालानुरूप नवनवीन बदल करून शिक्षणाचा दर्जा अधिक चांगला करण्याचा प्रयत्न केला जातो. स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारतातील शिक्षण व्यवस्था दर्जेदार बनविण्यासाठी व शैक्षणिक धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने खालील आयोगाची निर्मिती केली आहे.

1. भारतीय शिक्षण आयोग (राधाकृष्णन आयोग) – 1948-49
2. माध्यमिक शिक्षण आयोग (मुदलियार आयोग) – 1953
3. आचार्य नरेंद्र देव समिती – 1953
4. कोठारी आयोग – 1964-66
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 1986 (सुधारणा -1992)
6. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 2020

वरील आयोगामध्ये शैक्षणिक उदिदष्टे, विविध अभ्यासक्रम, आराखडा, पाठयक्रम, शिक्षकांची भूमिका, वर्तन बदल, मूल्यशिक्षण, शारीरिक शिक्षण, तंत्रविज्ञान, कला व भाषा शिक्षण इत्यादी संबंधित अनेक महत्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे एकविसाव्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. सन 2040 पर्यंत भारताला जागतिक ज्ञान-महासत्ता बनविणे. तसेच मानवी हक्क, शाश्वत विकास आणि उच्च जीवनमान यांच्याशी जबाबदारीपूर्वक बांधिलकी निर्माण करणारे ज्ञान, कौशल्य, मूल्य व स्वभाव विकसित करणे जेणेकरून प्रत्येक विद्यार्थी हा वैश्विक नागरिक म्हणून जीवन यशस्वी करतील. कोणत्या शैक्षणिक व्यवस्थेपेक्षा दुयम नसलेली दर्जेदार शिक्षणव्यवस्था असणे हे भारताचे ध्येय असले पाहिजे आणि सर्वोच्च दर्जा असलेल्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या सामाजिक किंवा आर्थिक पार्श्वभूमिचा विचार न करता सर्वांना प्रवेश असायला हवा.

संपूर्ण ज्ञानाची एकता आणि अखंडता सुनिश्चित करून एका बहुआयामी जगासाठी विज्ञान, समाजशास्त्र कला, मानव्यशास्त्रे आणि खेळ यांच्यामध्ये बहुशाखीय (Multi-Disciplinary) आणि समग्र शिक्षणाचा विकास होण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अंमलबजावणीची जबाबदारी राज्यातील विद्यापीठावर निश्चित करण्यात आली आहे. भविष्यातील शैक्षणिक योगदानामध्ये विद्यापीठ व महाविद्यालये हे महत्त्वाची भूमिका पार पाडणार आहेत.

भारत हा जगातील सर्वात मोठी राज्यघटना म्हणून ओळख असलेला देश आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना लिहण्याची महत्त्वपूर्ण काम केले आहे. भारत हा लोकशाहीप्रधान देश आहे. लोक कल्याणकारी योजना राबविणे, म्हणजे समाजातील सर्व घटकांना जास्तीत जास्त सोयी, सुविधा पुरविणे आवश्यक असते. यासाठी प्रशासकीय सेवेमध्ये वर्ग-1, वर्ग-2, वर्ग-3 आणि वर्ग-4 असे उच्च ते कनिष्ठ प्रशासकीय सेवेत उच्चपदस्थ अधिकारी (IAS, IPS, Secretary to Peon, Sweeper) ते चतुर्थ कर्मचारी यांची निर्मिती केली आहे. लोकसभा, राज्यसभा, संसद, कायदेमंडळ, विधी मंडळ, मंत्रालयाअंतर्गत गृह विभाग, संरक्षण विभाग, अर्थ विभाग, जिल्हाधिकारी

कार्यालये, पोलीस प्रशासन, जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, प्राथमिक, माध्यमिक शाळा यामध्ये मोठया प्रमाणात लोकसेवकांची नियुक्ती केली जाते.

राज्यातील अकृषी विद्यापीठांना सन 2007 मध्ये आकृतीबंध मंजूर केला आहे. परंतु मागील 10 वर्षापासून शासनाने पदभरतीवर बंदी लादली आहे. मोठया प्रमाणात सेवानिवृत्त होण्याची प्रमाणे वाढत असून विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयात शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्या अपु-या मनुष्यबळामुळे शिक्षकांना अध्यापनावर परिणाम होऊन शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होत असून त्याचा गुणवत्तेवर परिणाम होत आहे. यावर उपाय योजना होणे आवश्यक आहे.

संशोधकाचा विषय हा विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये, शैक्षणिक संस्थेशी निगडीत आहे. त्यामुळे पुढील प्रमाणे प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या रिक्त पदांचा अनुशेष व गुणवत्तेवरील परिणामांचा अभ्यास करणाार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंमलबजावणासाठी विद्यापीठातील माननीय कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, अधिष्ठाता विविध विषयातील अभ्यास मंडळे, प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी हे महत्त्वाचे घटक असून त्यांच्यावर ही संपूर्ण महत्वाची जबाबदारी आहे. पंरतु मागील 10 वर्षापासून शासनाने भरती बंदी घातली आहे. तसेच मागील दशकामध्ये मोठया प्रमाणात प्रदीर्घ अनुभवी शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत व होत आहेत. यामुळे उपलब्ध शिक्षक व कर्मचा-यांवरील शैक्षणिक व प्रशासकीय कामाचा ताण मोठया प्रमाणात वाढत आहे.

येत्या काळात विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त जागांचा अनुशेष आणि आरक्षित रिक्त पदे यामुळे मोठयाप्रमाणात

तांत्रीक अडचणी विद्यापीठ प्रशासनासमोर निर्माण झाल्या आहेत. विशेष महत्वाची बाब म्हणजे अनुशेषामुळे गुणवतेचा दर्जा कमी होत आहे.  यावर वेळीच उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयामध्ये आरक्षण, पदभरती आणि अनुशेष यामुळे गुणवत्तेवर व प्रशासकीय कामाकाजावर विपरित परिणाम होत आहे. तथापि त्यानुसार नियुक्ती होतात का ? याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

विद्यापीठात विविध शैक्षणिक संकुलामार्फत शैक्षणिक विविध अभ्यासक्रम चालविले जातात. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना मान्यता देणे, अभ्यासक्रमांना मान्यता देणे, अभ्यासक्रमाचे प्रवेश नियम, शुल्क, आरक्षण शिक्षकांच्या नेमणूका, मान्यता इत्यादी कामे पार पाडली जातात. विद्यापीठ पदभरती आणि महाविद्यालयीन पदभरतीमध्ये आरक्षण हा महत्त्वाचा मुदा आहे. समाजातील दलित, मागासवर्गीय, महिला, खेळाडू, माजी सैनिक, दिव्यांग, अनाथ या सर्वांसाठी आरक्षित पदे ठेवण्यात येतात. सदर पदावर त्या त्या संवर्गातील उमेदवाराची निवड करणे अनिवार्य आहे.

**1.2 संशोधना विषय निवडीचा हेतू :**

प्राचीन काळापासून भारतामध्ये राजकीय, सामाजीक, आर्थिक व शैक्षणिक सत्ता उच्चवर्णींच्या हाती होती. त्यामुळे अगदी अनादिकाळापासून बहुजन, दलित, मागासवर्गीय यांना दुययम स्थान परपरांगत मिळाले आहे. बहुजन, दलित, मागासवर्गांवर अत्याचार, अन्याय होत आलेला आहे. जाती तेढ, उच्च- निच्चता कमी करण्यासाठी आणि सर्वांना समान वागणूक मिळावी, मागासवर्गीय समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारावी, त्यांना प्रत्येक ठिकाणी प्रतिनिधीत्व देण्यासाठी स्वातंत्र मिळण्यापूर्वी महाराष्ट्रातील छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी सन 1902 मध्ये आरक्षण लागू केले आणि नोकरीत आरक्षण देऊन त्यांची अंमलबजावणी केली.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष झाले आणि त्यांनी अनुसूचित जाती व जमातीसाठी राजकीय प्रतिनिधीत्वासाठी 10 वर्षापर्यंत आरक्षणाची तरतूद केली. कालांतराने ती वाढविण्यात

आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मागासवर्गीयांच्या अन्यायाविरूध्द आवाज उठविला आणि त्यांच्या सर्वांगीण  कल्याणासाठी जीवनभर  कार्य केले.

आजच्या स्थितीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-जमाती, भटक्या जाती- जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास वर्ग, आर्थिकदृष्टया मागास वर्ग इत्यांदीसाठी पदभरती आणि पदोन्नती मध्ये आरक्षण निश्चित केले आहे. त्याच बरोबर समांतर आरक्षणामध्ये महिला, माजी सैनिक, दिव्यांग, अनाथ, खेळाडू, प्रकल्पग्रस्त यांच्या साठी आरक्षण निश्चित केले आहे.

आरक्षणाची प्रक्रिया गुंतागुंतीची आहे, त्यामध्ये बिंदूनामावली (Roster) ही महत्त्वाची आहे. जर पूर्णपणे 100 जागा मंजूर आणि भरावयाच्या असतील तरच 100 बिंदूवरील प्रवर्गास जागा प्राप्त होतात, 100 पेक्षा कमी जागा मंजूर असल्यास अपूर्णांकात सर्व घटकांना न्याय मिळत  नाही. यासाठी महाराष्ट्र शासनाचे वेळोवेळी प्रसिध्द केलेले शासन निर्णय, अधिसूचना, मंत्रीमंडळाचे निर्णय यानुसार अंमलबजावणी करताना अडचणी निर्माण होतात. तसेच संस्थाचालक, प्रशासकीय अधिकारी यांच्या उदासिन वृत्तीमुळे मागावर्गीय उमेदवारांवर अनेकवेळा अन्याय झालेला आहे. त्यामुळे शासनाचा समाज कल्याणाचा हेतू, उददेश साध्य होत नाही. परिणामी मागासवर्गींयाना त्यांच्या  हक्कापासून वंचित राहावे लागते.

संशोधक हा विद्यापीठ प्रशासकीय सेवेत कार्यरत असल्यामुळे  व लोकप्रशासन विषयाचा एक विद्यार्थी म्हणून रिक्त पदाच्या अनुशेषामुळे अनेक प्रशासकीय समस्या निर्माण होताना व त्याचा गुणवत्तेवर परिणाम होत असल्याचे लक्षात आले आहे. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातील भरती प्रक्रियेतील आरक्षण, बिंदूनामावली, रिक्त पदाच्या अनुशेष यामुळे प्रशासकीय कामकाजातील अडचणींचा अभ्यास करून उपाय योजना सूचविणे आवश्यक आहे. मागासवर्गींयासाठी व आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठामध्ये विशेष कक्षांची (Special cell) स्थापना केली आहे. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालये यांच्या अनुशेषाची अंमलबजावणीची जबाबदारी

विशेष कक्षाची आहे. ती भूमिका व्यवस्थित पार पाडली जाते का ? याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## 1.3 संशोधनाची उदिष्टे :

कोणतेही कार्य अथवा कामकाज यशस्वीपणे पूर्ण करावयाचे असेल तर प्रथम ध्येय उदिष्टय निश्चित करावे लागतात त्याचप्रमाणे संशोधन कार्य उत्तम रीतीने पार पाडण्यासाठी संशोधनाची उदिदष्टे समोर ठेवून संशोधन कार्य करणे आवश्यक आहे.प्रस्तुत संशोधन कार्यासाठी खालील उदिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

1. विद्यापीठ व महाविद्यालयात रिक्त पदे वेळोवेळी न भरल्यामुळे प्रशासकीय कामकाजावर व गुणवत्तेवर होणा-या परिणामांचा अभ्यास करणे.
2. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालातील मागासवर्गीयांसाठी असलेल्या विशेष कक्ष व इतर प्रशासकीय कार्यालयाच्या रिक्त पदभरतीच्या कार्यपद्धती व भूमिकेचा अभ्यास करणे.
3. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील बिंदूनामावलीची अंमजबजावणीचा अभ्यास करणे.
4. जात पडताळणी प्रमाणपत्रामुळे विद्यापीठ व सलंग्नित महाविद्यायीन प्रशासन आणि मागासवर्गीय कर्मचा-यांना येणा-या अडचणींचा अभ्यास करणे.
5. शिक्षक संवर्गातील सवंर्गनिहाय आरक्षण अंमलबजावणीतील अडचणींचा अभ्यास करणे.
6. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातील रिक्त पदांचा शोध घेवून रिक्त पदे राहण्याच्या कारणांचा शोध घेणे.
7. अनुशेषाच्या गुणवत्तेवर होणारा परिणामावर उपाय योजना सुचविणे.

## 1.4 संशोधनाची गृहितके –

1. महाराष्ट्र शासनाच्या पद भरती बंदी धोरणामुळे अनुशेष जास्त प्रमाणात वाढला आहे.
2. विद्यापीठ व महाविद्यालयात असलेल्या अनुशेषामुळे अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन कार्यातील गुणवत्ता कमी झाली आहे.
3. विद्यापीठ व महाविद्यालयात मंजूर पदापैकी सर्वसाधारण प्रवर्गापेक्षा आरक्षित पदाचा अनुशेष जास्त आहे. .
4. आरक्षित पदे भरण्यासाठी महाराष्ट्र शासन, विद्यापीठ प्रशासन आणि संलग्नित महाविद्यालयांची उदासिन भूमिका आहे.
5. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयात भरती प्रक्रियेत समांतर आरक्षण (महिला, दिव्यांग, खेळाडू, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त अनाथ व इतर ) पाळले जात नाही.
6. विशेष कक्ष, मागासवर्गीय कक्ष, मंत्रालयीन कक्ष आणि विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये यांच्यात समन्वय नाही.

## 1.5 समस्या सूत्रण :

विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयामध्ये मोठया प्रमाणात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर प कर्मचारी यांचा थेट संबंध येतो. प्रामुख्याने पदवी व पद्व्युतर प्रवेश प्रक्रिया, परीक्षा आणि निकाल, शिकवणी वर्ग आणि प्रशासकीय कामकाज असे विद्यापीठीय कामकाजाचे स्वरूप आहे.

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयीन विद्यार्थी संख्येच्या प्रमाणावर महाराष्ट्र शासन शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी पदांचा मंजूरी देते. दिलेल्या मंजूर पदामध्ये सर्वसाधारण आणि मागासवर्गीय असे दोन भागामध्ये विभागणी करून पदभरती होत असते. परंतु मागासवर्गीतील अनेक जातीचे आणि समांतर आरक्षण यासाठी शासनाने बिंदूनामावली तयार करून दिली आहे. प्रत्येक प्रवर्गासाठी ठरवून दिलेल्या आरक्षणाच्या

प्रमाणात त्याच प्रवर्गाच्या उमेदवाराची नियुक्ती होणे आवश्यक असते. यासाठीच प्रत्येक विद्यापीठात विशेष कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

**महाराष्ट्रातील प्रवर्गनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे**

**महाराष्ट्रातील प्रवर्गनिहाय आरक्षण**

| प्रवर्ग | संक्षिप्त नाव | आरक्षण |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | एस.सी. (S.C.) | १३% |
| अनुसूचित जमाती | एस.टी. (S.T.) | ७% |
| इतर मागास वर्ग | ओ.बी.सी. (O.B.C.) | १९% |
| विशेष मागास प्रवर्ग | एस.बी.सी. (S.B.C.) | २% |
| विमुक्त जाती – अ | व्ही.जे. (V.J.) | ३% |
| भटक्या जाती – ब | एन.टी. – १ (N.T.-1) | २.५% |
| भटक्या जाती – क | एन.टी. – २ (N.T.-2) | ३.५% |
| भटक्या जाती – ड | एन.टी. – ३ (N.T.-3) | २% |
| आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग | ई.डब्ल्यु.एस. (E.W.S.) | १०% |
| अराखीव / सर्व साधारण | खुला (OPEN) | 38% |
| **एकूण** | | **100%** |

केंद्र व महाराष्ट्र शासन तसेच विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून वेळोवेळी दिलेल्या निर्देशाद्वारे सर्व नियमांचे पालन करून विद्यापीठ व महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची पदभरती केली जाते. त्यावेळी सर्व नियम व रोस्टरची तंतोतंत अंमलबजावणी पडताळणी होणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक प्रवर्गाचा अनुशेष किती प्रमाणात शिल्लक आहे याचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. तसेच पदवी व पद्व्युंतर प्रवेश प्रक्रियेमध्ये देखील आरक्षणानुसार दिले जातात किंवा नाही याचीही पडताळणी करणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी मी "विद्यापीठ आणि महाविद्यालयीन प्रशासनातील रिक्त पदांच्या अनुशेषाचा गुणवत्तेवर

होणारा परिणाम : एक प्रशासकीय अभ्यास” (विशेष संदर्भ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड ) या विषयाची निवड केली आहे.

## 1.6 संशोधनाचा विषय :

“विद्यापीठ आणि महाविद्यालयीन प्रशासनातील अनुशेषाचा गुणवत्तेवर होणारा परिणाम : एक प्रशासकीय अभ्यास” (विशेष संदर्भ : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड )

## 1.7 संशोधन पध्दती :

संशोधनाची यशस्विता ही संशोधनासाठी निवडलेल संशोधन पध्दती आणि साधने यावरच अंवलंबून असते. संशोधनासाठी संशोधन पध्दतीची निवड करतांना संशोधन विषयाचे स्वरूप विचारात घेऊन आपणास कोणत्या प्रकारच्या माहितीचे संकलन करणे आवश्यक आहे, त्यावर अवलंबून असते. संशोधनामध्ये सर्वात जास्त विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जातो.

प्रस्तुत संशेधन कार्य पूर्ण करण्यासाठी आवश्यक पुरक माहिती संकलनाच्या कार्यासाठी प्राथमिक आणि दुयम स्त्रोत आणि सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर संशोधनासाठी करण्यात येईल. सर्वेक्षण संशोधनात वर्तमान काळ, परिस्थितीवर भर देऊन अभ्यास केला जातो. सर्वेक्षणामध्ये खालील प्रकारची माहिती संकलित केली जाते.

प्रस्तुत संशोधनात संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

1. वर्तमान स्थिती
2. अपेक्षित स्थिती
3. आवश्यक साधनांचा शोध

प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्राथमिक स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

**अ. प्राथमिक स्त्रोत -**

1. मुलाखत
2. प्रश्नावली
3. निरीक्षण तथा  अवलोकन

**ब. द्वितीय स्त्रोत :**

विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयाचे वार्षीक अहवाल, महाविद्यालयांचे वार्षीक अंक, विद्यापीठाने प्रसिदध केलेले परिपत्रके, कार्यआदेश, अध्यादेश, परिनियम, विद्यापीठ प्राधिकारणाचे इतिवृत्त, ठराव, शासनास सादर केलेले आकृतीबंध, प्रस्ताव संकेतस्थळावरील प्रकाशित माहिती इत्यांदींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016, शासनाच्या आरक्षणा संदर्भात काढलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके, मंत्रिमंडळाचे ठराव आरक्षणाचे कायदे, न्यायालयीन निर्णय इत्यांदीचा अभ्यास करण्यात येईल.

**1.8 नमुना निवड :**

प्रस्तुत संशोधनासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसर, विद्यापीठ उपकेंद्र व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली जिल्हा या 04 जिल्हयातील संलग्नित महाविद्यालयांची निवड करण्यात येईल.  विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुले, उप उपरिसर आणि संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांच्यातून नमुना म्हणून निवड करण्यात येईल. विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी, नोंदणीकृत संघटनेचे पदाधिकारी, विशेष कक्षाचे अधिकारी, मागासवर्गीय कार्यालयाचे आयुक्त, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व कर्मचारी यांची नमुना म्हणून निवड करण्यात येईल. उपरोक्त जिल्हयातील जिल्हास्तरावरील महाविद्यालये, प्रत्येक जिल्हयातील तालुका स्तरावरील महाविद्यालये आणि ग्रामीण भागातील महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी,

कर्मचारी आणि नोंदणीकृत संघटनेचे पदाधिकारी यांची लॉटरी पध्दतीने निवड करण्यात येईल.

**प्रकरण योजना –**

प्रकरण पहिले – प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रकरण दुसरे – आरक्षण धोरणाचा इतिहास व सद्यस्थिती

प्रकरण तिसरे – विद्यापीठ व महाविद्यालयीन प्रशासन : संघटन व कार्यपद्धती

प्रकरण चौथे – विद्यापीठ व महाविद्यालयातील आरक्षण आणि रिक्त पदांचा अनुशेष

प्रकरण पाचवे – रिक्त पदांचा अनुशेषाचा गुणवत्तेवर होणारा परिणाम

प्रकरण सहावे – प्राप्त माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण सातवे – निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ ग्रंथ सूची

परिशिष्टये

## संदर्भग्रंथ

1. डॉ. लक्ष्मण कोत्तापले, 2009. *भारतातील सामाजिक प्रशासन*, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद,
2. डॉ. पंचशील एकंबेकर व इतर, 2010. *लोकप्रशासनातील नवप्रवाह*, ओमसाई प्रकाशन, नायगाव,
3. डॉ. शेफली पांडया व इतर, जुलै-2011. *शिक्षणातील संशोधन पध्दती,* प्राध्यापक नि-संचालक, दूर व मुक्त शिक्षणसंस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई,
4. डॉ. कत्तूरवार बी.आर., 2011.*लोक प्रशासनशास्त्र ,* अभंग प्रकाशन, नांदेड
5. सोनवणे जगताप, सप्टेंबर 2004 ,अधिकारी मार्गदर्शक**,** सोनादिपा पब्लिशर्स धुळे

6. सोनवणे जगताप, सप्टेंबर 2007, कर्मचारी मार्गदर्शक, सोनादिपा पब्लिशर्स धुळे
7. फाडिया बी.एल. 2001 , " लोकप्रशासन", साहित्य भवन पब्लिकेशन, नवी दिल्ली.
8. देशमुख लक्ष्मीकांत, जून 2011, " बखर: भारतीय प्रशासनाची " साधना प्रकाशन,पुणे
9. बंग के. आर., जून २००४ " भारतीय प्रशासन" विद्या प्रकाशन औरंगाबाद

**राजपत्र/हॅण्डबुक -**

1. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई, शासन निर्णय क्र. सं.-2008/यादी/प्र.क्र.553/मावक-5 दि.26.9.2008
2. **प्रा. सुधाकर मानकर,** *सिनिअर कॉलेज हँडबुक- ए रेडी रेफरन्स,* खंड तिसरा, मे आरती ऑफसेट, कोल्हापूर, जानेवारी -2002.
3. **महाराष्ट्र शासन राजपत्र**, *महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016*, असाधारण भाग चार, 11 जानेवारी 2017
4. **राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020,** शिक्षण मंत्रालय, भारत सरकार

**Website:**

5. www.srtmun.ac.in Shodhganga @ INFLIBNET: Swami Ramanand Teerth Marathwada University
6. https://gr.maharashtra.gov.in/ शासन निर्णय - महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळ, भारत (maharashtra.gov.in)

**संशोधन मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. बालाजी आर. कत्तुरवार**
विभागप्रमुख,
संशोधन केंद्र,
देगलूर महाविद्यालय, देगलूर

**संशोधक**
शिवाजी डी. चांदणे
संशोधन केंद्र
देगलूर महाविद्यालय, देगलूर